**<u>सं.फौ.ख.क्र.१/२०१८</u>**
मनोज शिंदे वि. सक्षम बिल्डर

**<u>निशाणी क्र.६९</u>**

**<u>फिर्यादीतर्फे साक्षीदार क्र. ४ –</u>**

नाव – गोदावरी रघुनाथ कुंभार

वय –४२, धंदा – नोकरी

रा. सातारा, ता. जि. सातारा.

**फिर्यादी साक्षीदाराचा शपथेवर सरतपास श्री. आर. वाय. कदम वकील यांच्यामार्फत :–**

मी सन २०१२ पासुन दुय्यम निबंधक कार्यालय येथे कनिष्ठ लिपीक म्हणून कार्यरत आहे. मी आज रोजी फलटण दुय्यम निंबधक कार्यालय येथे वरिष्ठ लिपीक म्हणून कार्यरत आहे. आमच्या कार्यालयास प्रस्तुत प्रकरणाचे समन्स आले होते. त्याप्रमाणे साक्षीस येणेकामी दुय्यम निबंधक यांनी मला अधिकारपत्र दिले आहे. दिनांक ०५/१०/२०१७ रोजी आमच्या कार्यालयात केलेल्या दस्तांचे मुळ रजिष्टर मी आज सोबत आणले आहे. मी सदर रजिष्टरचे पान नं. ६० वरील अनुक्रमे नं. ११ ते १८ यावर नोंदलेले दस्त याची प्रत अभिलेखात दाखल केली आहे. सदर प्रतीचा मजकुर व मुळ रजिष्टरमधील पान नं. ६० वरील मजकुर हा सारखा आहे. तसेच सदर प्रतीवर सह दुय्यम निबंधक श्री. पठाण यांची सही आहे. तसेच कार्यालयाचा शिक्का आहे. श्री. पठाण यांनी माझ्या समक्ष सही केली आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. सदर प्रतीस **निशाणी ७१** देण्यात आली.

तसेच मी समन्सप्रमाणे दिनांक ०५/१०/२०१७ रोजी मनोज महादेव शिंदे व नितीन महादेव भोसले व इतर यांच्यात झालेला साठेखताचा दस्त देखील सोबत आणला आहे. सदर दस्ताचे प्रमाणीत प्रतीस **निशाणी ७२** देण्यात आली.

**फिर्यादी साक्षीदाराचा उलटतपास आरोपीतर्फे श्री. व्ही. डी. कदम वकील यांच्यामार्फत –**

प्रश्न– साठेखताचा मुळ दस्त कोणी लिहीला.

उत्तर – निशाणी ७१ व मुळ रजिष्टर यावरुन नंदीणी होले हिने लिहीला असे दिसत आहे.

हे म्हणणे खरे आहे की, नंदीनी होले ही साठेखतातील पक्षकार नाही. हे म्हणणे

**<u>सं.फौ.ख.क्र.१/२०१८</u>**
मनोज शिंदे वि. सक्षम बिल्डर

खरे आहे की, मी दिनांक ०५/१०/२०१७ रोजी फलटण येथे कार्यरत नसल्याने मला साठेखता विषयी व्यक्तीशहा माहीती नाही. हे म्हणणे खरे नाही की, निशाणी ७२ चे साठेखत हे मुळ साठेखताप्रमाणे नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीशी संगणमत करुन मी अभिलेखात चुकीची नक्कल दाखल केली आहे.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत

ठिकाण : फलटण
दिनांक १६/०२/२०२६

**(व्ही. एस. वाघ)**
न्याय दंडाधिकारी प्रथम श्रेणी,
फलटण, जि. सातारा.